# गोडाचे तारतम्य

जानेवारीत साजरा करण्यात येणाऱ्या मकरसंक्रातीच्या सणानिमित्त ‘तिळगुळ घ्या, आणि गोड बोला’! अर्थात गोड बोलायला संक्रातसणच हवा असे मुळीच नाही. इतरांना आणि स्वत:लाही संतोष मिळेल, असे बोलावे असे खुद्द संत कबीर खालील पंक्तीत सांगतात-

"ऐसी बानी बोलिए, मन का आपा खोय
औरन को शीतल करै, आपहु शीतल होय!”

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे... हे वाक्य सर्वश्रुत आहे. आणि हेही खरे, की ज्या समाजात आपण राहतो त्या समाजात गोडीगुलाबीने रहावे, एकमेकांची दखल घ्यावी. प्रश्न हा, की इतरांची दखल घेत असताना, त्यांस वास्तवाची झालर असावी, की फसवी असली तरी सतत **साखरपेरणी** करत रहावी? यावरून माझ्या लहानपणी माझ्या आजीने सांगितलेली एक गोष्ट आठवली. (आजी कित्येकदा स्वत: रचून गोष्ट सांगत असे. त्यातलीच ही एक असावी.)

एका सधन व्यापाऱ्याच्या पत्नीकडे संक्रात सणानिमित्त महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम होता. व्यापाऱ्याची पत्नी सणानिमित्त नटून थटून तयार झाली. एक एक आमंत्रित महिला येऊ लागल्या. गप्पागोष्टी झाल्या. हळदीकुंकू, वाण/भेटवस्तू देणें सर्व यथासांग पार पडले. पण एकीकडे त्या व्यापाऱ्याची पत्नी मनातल्या मनात धुमसत होती. आलेल्या भगिनी आपापल्या घरी परतल्या, अन् हिच्या मनातील राग उफाळून आला. “सगळ्यांचे डोळे फुटलेत की काय?”... असं पुटपुटत रागाच्या भरात तिने घरातल्या वस्तूंची तोडफोडही केली. त्या आवाजाने शेजारीण घरात डोकावत म्हणाली,

“अगं, इतका छान भरजरी नवीन शालू नेसली आहेस, अंगभर दागिने खुलून दिसताहेत, मग हा त्रागा कशासाठी?”

त्यावर त्या व्यापाऱ्याची पत्नी म्हणाली,

“पण हळदीकुंकुवाच्या कार्यक्रमाला आलेल्यां कुण्णीही तोंड उघडून एका शब्दानेही छान काय, नुस्तं बरंही म्हंटलं नाही माझ्या साडीला.”

शेजारीण हंसून म्हणाली, “अगं साडी छान आहे, हे तुला माहीत आहे ना, मग इतरांकडून पावती नाही मिळाली, तर बिघडले कुठे?”

वरील गोष्ट तशी जुन्या वळणाची, पण त्यातून दिसणारी मानवी वृत्ती बहुतेकांच्या अनुभवांस येतेच. काहीवेळा मुद्दाम दुसऱ्याच्या चांगल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करणारे, आणि काहीवेळा दुसऱ्याकडून सतत प्रमाणीभूत व्हावे ही अपेक्षा धरणारे आपल्या अवतीभवती दिसतात. फ़ेसबुक सारख्या सोशलमीडियावर, कुणाकुणाची पोस्ट, फोटो पाहून, वाचून, आणि कित्येकदा न वाचूनही काहीजणांचा ‘लाईक’ शिक्क्याचा रतीब अखंड चालू असतो. तर काहीजण दुसऱ्याच्या अतिशय कौतुकास्पद गोष्टींनाही मूग गिळून मुद्दाम दुर्लक्ष करत असतात.

’लाईक’ चिन्हाचा फ़ेसबुकमधे समावेश करण्यामागे फेसबुक कंपनीतील ज्या काही माजी कर्मचाऱ्यांचे योगदान होते त्यात एक नाव - लेह पर्लमन. २००९ सालची गोष्ट. ‘एकाद्या पोस्टवर ‘छान’, असे शब्द अनेकांनी पोस्ट केले तर तोच “छान’ शब्द सारखा वाचायला कंटाळवाणे होते, पण त्या ऐवजी आपण ती भावना दर्शवणारे चिन्ह (emoji) किंवा चित्र वापरले तर?’ असा विचार करून लेह पर्लमन व तिच्या सहकाऱ्यांनी फ़ेसबुक कंपनीला काही चिन्हे सुचविली, आणि मग फ़ेसबुकने ‘लाईक’- साठी अंगठा वर दर्शवणारे चिन्ह निश्चित केले. ही गोष्ट २००९ मधली. त्यानंतर, डोक्यावरून काही उन्हाळे, पावसाळे गेल्यावर २०१७ मधे एका मुलाखतीत लेह पर्लमन म्हणाली, “व्यवहारी जगात सार्वजनिक प्रमाणीकरण असणे आवश्यक असते.” हल्ली कला असो वा वाणिज्य, TRP - Target Rating Points चे महत्त्व वाढले आहे, हे आपण पाहतोच. सोशल मीडियाच्या लाईक्सने कित्येकांना चांगले काम करण्याचा हुरूपही येतो. पण याचीच दुसरी बाजू म्हणजे, दैनंदिन जीवनात, अतिप्रमाणात सोशल मीडिया वापरणाऱ्यांपैकी काहींना सतत समाजापुढे प्रदर्शन करत रहाण्याची सवय जडते. आणि मनाजोगता प्रतिसाद, लाईक्स मिळाले नाहीत तर अस्वस्थता, स्वत:बद्दल न्यूनगंडही (inferiority complex) वाटू लागतो. काहीजण तर पैसे टाकून, स्वत:चे पब्लिक रेटिंग वाढवतात. हाही एक मार्केटिंगचा प्रकार!

“खरंतर, स्वत:च्या आवडीनुसार केलेल्या कामातून स्वत:ला मिळणाऱ्या निर्भेळ आत्मिक समाधानाची सोशल मीडियाकडून मिळणाऱ्या क्षणिक हजारो‘लाईक’शी तुलना होऊच शकत नाही.” असंही लेह पर्लमनने आपल्या मुलाखतीत सांगितलं होतं. जिने कोट्यावधी लोकांना फ़ेसबुकच्या ‘लाईक’ बटनाचे वेड लावले तीच व्यक्ती आता या ‘लाईक’ बटनाच्या वापराचा रास्त आणि मर्यादित वापर असावा असा विचार करू लागली आहे, हे विशेष. (केव्हढा हा विरोधाभास.) तिच्या या विचाराला माझा निश्चितच एक लाईक


Copy Rights: Vinata Kulkarni

अर्थात याचा अर्थ गोड बोलू नये असा नाही. कारण,

चांगल्याला नाके मुरडणे हा हेवेदावेपणा
चांगल्या कृतीकडे पाठ फिरवणे हा हेकेखोरपणा
चांगल्याला वाईट म्हणणे म्हणजे दुष्टपणा
चांगले नाही हे कळूनही गोडवे गाणे हा दिखावूपणा
आणि चांगल्या कृतीचे मन:पूर्वक कौतुक करणे हा चांगुलपणा !

तेव्हा जिथे जिथे स्तुती करणे योग्य तिथे तिथे तसे करणे रास्तच.

असे केल्याने, ते काम करणाऱ्याची कळी खुलते; आपल्या कामाचे चीज होते आहे हे समजल्याने, व्यक्तीला अधिक चांगली कामगिरी करण्यास उत्साह वाटतो. दुसऱ्याला प्रसन्न करता करता आपलेही मन प्रसन्न होते.

परंतु अवाजवी, खोटी स्तुती करावी असे नव्हे! तो तोंडपुजेपणा होईल. म्हणूनच नकारार्थी, निरर्थक गोड बोलत बसण्यापेक्षा **चांगुलपणा पारखून, स्तुती करण्यायोग्य गोष्टी शोधायला हव्यात**.

एकंदरित काय, सोशल मीडिया असो, किंवा प्रत्यक्ष व्यावहारिक जग, सत्य बोलावे, दुसऱ्याला प्रिय (गोड) असे बोलावे, कठोर सत्य असले तरी अप्रियपणे बोलू नये आणि वरकरणी गोडवेही गाऊ नयेत. थोडक्यात,

"सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्, न ब्रूयात् सत्यम् अप्रियम् ।
प्रियं च नानृतम् ब्रूयात्, एष धर्मः सनातन: ॥ "

**- विनता कुलकर्णी** (जानेवारी, २०२०)

***


Copy Rights: Vinata Kulkarni